१३) मान्यता प्राप्त वर्ग तुकड्या व्यतिरिक्त कोणताही वर्ग/अतिरिक्त तुकडी अनधिकृतपणे चालु करू नये.
१४) शाळेची वेळ १०.३० ते ५ व शनिवारी सकाळी पाळी ७ ते १२.०५ शाळा पुर्व परवानगीशिवाय दुबार पाळीत भरवू नये. १५) शाळेच्या फी चे दर शासनाने विहीत केलेनुसार असले पाहिजेत. त्यापेक्षा जास्त असता कामा नये (रु १५/- शिक्षण शुल्क आकारण्यांची अनुमती आहे). १६) मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधील विहीत अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

मान्यता प्राप्त वर्ग – १ ला ते ____
प्रत्येकी एक तुकडी.

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, नागपूर

**प्रतिलिपी –**

१) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर
२) मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
३) समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
४) अनुदान विभाग (प्राथमिक) शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर

प्राप्त
दि. १९/०१/२०११

क्र. जिपना/शिक्षण/प्राथ/मान्यता/ २८८ /
कार्यालय- जिल्हा परिषद, नागपूर
शिक्षण विभाग (प्राथमिक)

दिनांक - १२/१/२०११

प्रति,
सचिव, भारतीय शिक्षण मंडळ, राजाबक्षा नागपूर
द्वारा संचालित
भाऊसाहेब दफ्तरी इंग्रजी प्राथ.शाळा
महाल नागपूर

(शिक्का: ९५६ दि. २६/१/२०११)

विषय :- इंग्रजी माध्यमाचे खाजगी प्राथमिक शाळेस मान्यता.

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन पत्र क्र. व्हीएलएस- शानिक्र/नप्राशा/१००८ प्रशि-३ ( ) प्राथमिक शिक्षक-३ १८.८.२००९
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२. दि. - -

२) शिक्षण उपसंचालक यांचे पत्र क्र. प्रपत्र/ब/ परवानगी ३०८/दि. ७.१.२०११
दिनांक - -

उपरोक्त विषयांकित संदर्भान्वये या कार्यालयाद्वारा आपले भाऊसाहेब दफ्तरी इंग्रजी प्राथ.शाळा - महाल - नागपूर माध्यम इंग्रजी या खाजगी प्राथमिक शाळेस "खास बाब" म्हणून कायम विना अनुदान तत्वावर (नो ग्रँट बेसीस) चालू शैक्षणिक सत्रापासुन खालील अटींच्या आधीन राहून मान्यता देण्यात आहे. शैक्षणिक सत्र जून २००९ पासून

१) नियमानुसार संस्था रजिस्टर्ड असली पाहिजे. २) शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे. ३) शाळेत, शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यवसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद विहीत वयोमर्यादेत व प्रशिक्षितच (एस. एस. सी. डी. एड.) व शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतन श्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून (मागावर्गीय शिक्षकांचे प्रमाणासह) नेमला पाहिजे. ४) संस्थेच्या आर्थिक परिस्थितीत संस्थेकडील भौतिक सुविधा व्यवस्थापन, विषयक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य अशी स्वतःची इमारत असणे आवश्यक आहे. ५) संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे तसेच अभ्यासक्रम पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे. ६) संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी / कर्मचाऱ्यांसाठी विहीत नोंदवह्या अद्यावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वीत ठेवल्या पाहिजेत. ७) संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणाकडून ठेवणे आवश्यक ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे तसेच तक्तशीरपणा नियमीतपणा आणि नियमीत उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे. ८) संस्थेने परवानगीसाठी केलेले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यांत कोणताही बदल करता येणार नाही. ९) संस्थेने शासनाने वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे, नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. १०) संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळांवर विहीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. ११) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेले आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. १२) शासनाने प्रत्येक वर्गामध्ये शासनाने ठरवून दिलेली विद्यार्थी संख्या व हजर संख्या असली पाहिजे.

१) वर्गतुकडी निर्धारण व शिक्षक निर्धारण प्रत्येक वर्षी करावे (मागे पहा.)
२) नैसर्गिक वाढीचे वर्ग मंजुरी करिता स्वतंत्र प्रस्ताव सादर करावा.